रोटरी क्लब लातूर सेंट्रल द्वारा क्लब बुलेटीन तिसरा अंक प्रकाशित करत असताना बुलेटिन एडिटर यांचे खूप खूप अभिनंदन सप्टेंबर महिना रोटरी मध्ये बेसिक एज्युकेशन तथा लिटरसी करिता समर्पित असून आपल्या क्लबच्या माध्यमातून हेल्थ या विषयांमध्ये दिनांक सात सप्टेंबर २०२२ रोजी गोदावरी शाळेमध्ये ८०० मुलींचे हिमोग्लोबिन तपासणी तथा औषध उपचार हे शिबिर संपन्न झाले याचे प्रोजेक्ट चेअरमन रवींद्र चामले होते तसेच लिटरसी विषयांमध्ये १४ सप्टेंबर २०२२ रोजी भारत शाळा या ठिकाणी चित्रकला स्पर्धा तथा भाषण स्पर्धा इंटरॅक्ट क्लब ऑफ लातूर सेंट्रल च्या सहकार्यातून आयोजित करण्यात आले होते त्याचे बक्षीस वितरण दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी क्लब च्या वतीने ध्वजारोहणाचा मान देऊन त्या ठिकाणी बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला २८ सप्टेंबर २०२२ रोजी निमल हेल्थ या विषयांमध्ये रोटेरियन डॉक्टर नेताजी शिंगटे यांच्या प्रोजेक्ट चेअरमनशिप अंतर्गत जानवळ या ठिकाणी पश्मी व कारवान या प्रजातीच्या संवर्धना साठी त्यांची तपासणी औषध उपचार रेबीज व्हॅक्सिनेशन कॅम्प संपन्न झाला ज्यामध्ये २०० श्वाननी सहभाग नोंदवला व २९ सप्टेंबर २०२२ रोजी नवीन शैक्षणिक धोरण २०२० या विषयावरती परिसंवाद तथा शिक्षण क्षेत्रामध्ये उच्चतम कार्य केलेले अकरा शिक्षकांना राष्ट्र शिल्पकार पुरस्कार चे वितरण करून हा लिटरसी महिना आपण साजरा केला यासाठी लिटरसी डायरेक्टर रो जे डी मामडगे यांचे सहकार्य लाभले तसेच प्रत्येक सदस्यांनी हा महिना साजरा करत असताना आपलं प्रकल्प प्रती दायित्व दाखवून प्रकल्प खूप मोठ्या प्रमाणात होण्यासाठी मदत केली त्याचप्रमाणे इतर हेल्थ विषय ही प्रोजेक्ट या महिन्यामध्ये संपन्न झाले आपल्या क्लबचे नाव समाजामध्ये वाढवण्यासाठी या प्रकल्पांची मोलाची भूमिका असणार आहे या महिन्यामध्ये झालेला रोट्रैक्ट सोबत चा दांडिया उत्सव हा लातूर परिसरातील विविध दांडीया उत्सवामध्ये सर्वात नावलौकिक मिळवणार असा उत्सव संपन्न करण्यामागे क्लबच्या सदस्यांची मोलाची भूमिका होती रोट्रॅक्ट मित्रांची खूप मोठी मेहनत होती आरसीसी गिरीश ब्याळे प्रोजेक्ट चेअरमन रो विजय धाकपाडे यांच्या प्रयत्नातून हा कार्यक्रम अतिशय यशस्वी रित्या संपन्न झाला याचा पब्लिक इमेज वरती खूप मोठा परिणाम आपल्या क्लबच्या फायद्यासाठी होणार आहे यापुढेही असे विविध कार्यक्रम आपल्या क्लबच्या माध्यमातून राबविण्यात येतील आतापर्यंत आपला सहयोग खूप मोलाचा आहे तसाच पुढेही राहील अशी आशा बाळगतो व सर्वांना आगामी येणारे सण दसरा दिवाळीच्या शुभेच्छा देतो धन्यवाद व्यक्त करतो

अध्यक्ष
**रो हेमंत रामढवे**

रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल Sept .2022 संवाद

# शालेय मुलींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर





दि ०७/०९/२०२२ रोज़ी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर संपन्न झाले ज्यामध्ये ८०० मुलींचे हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. त्यामध्ये कमतरता आढळलेल्या मुली वर उपचार करन्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थांचे अध्यक्ष श्री लक्ष्मीरमनजी लाहोटी तथा प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब लातूर सेंटरचे अध्यक्ष हेमंत रामढवे तसेच दयानंद शिक्षण संस्थांचे कोषाध्यक्ष व रोटरी क्लब ऑफ़ लातूर सेंट्रल चे संस्थापकिय अध्यक्ष संजय जी बोरा दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या प्राचार्य डॉ क्रांती सातपुते रोटरी क्लब लातूर सेंटरचे सचिव बाळासाहेब खैरे प्रोजेक्ट चेअरमन रवींद्र चामले शालेय शिक्षण समितीचे भराडीया गोदावरी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सुचिता बोरगावकर डॉ सुनिता बजाज डॉ संध्या वारद व्यासपीठावर उपस्थित होते सूत्रसंचालन सुवर्णा डोईजोडे यांनी केले तर मान्यवराच्या मनोगतनंतर औपचारिक उद्घाटन चा कार्यक्रम संपन्न झाला या प्रसंगी रोटरी सदस्य राजगोपाल जी मुंदडा,मिलिंद आंबेकर, , चंद्रकांत गुंडरे , विनोद पडगे, मेहुल कामदार, गिरीश गारठे, भालचंद्र थळकरी,गिरीश ब्याळे , पुरुषोत्तम नोगजा, शिंदे सर डॉ नेताजी शिंगटे, वैभव बेल्लाले सोमेश कान्नव दयानंद फार्मसी कॉलेज व शाळा चे वोलांटीर्स शिक्षक व्रंद व विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते







डिस्टिक ३१३२ वर्ष २०२१-२२ मध्ये क्लबला मिळालेली पारितोषके त्यांचा आनंद साजरा करताना क्लब सदस्य





दिनांक १४ सप्टेंबर रोजी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंटर आणि रोटरॅक्ट क्लब लातूर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमानाने चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या स्पर्धेमध्ये साधारण १२० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे बक्षिस वितरण दि. १७ सप्टें. रोजी करण्यात आले.

## अभियंता दिन

१५ सप्टेंबर रोजी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल येथे अभियंता दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. लक्ष्मीकांत गौड यांनी अभियंता दिन का साजरा केला जातो व या पाठीमागील व्यक्तिमत्व डॉ. विश्वेश्वरय्या मोक्षगुंडम यांच्या उत्कृष्ट अशा कार्याबद्दल प्रेझेन्टेशन द्वारे माहिती दिली तसेच अभियंता चे महत्व आणि कौशल्य याबद्दल माहिती दिली. अभियंता पुष्पराज खुब्बा यांनी अभियंता दिनाचे महत्त्व सांगितले तसेच रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल तर्फे सर्व अभियंता सदस्यांचे सत्कार व गौरव करण्यात आले.



# ॲन्टी रेबीज व्हॅक्सीनेशन कॅम्प

रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल च्या वतीने दिनांक २८ सप्टेंबर रोजी जानवळ येथे पाळीव श्र्वाना साठी अँटी रेबीज व्हॅक्सिनेशन कॅम्प , आरोग्य तपासणी व मोफत औषध उपचार हा कार्यक्रम संपन्न झाला .

या कॅम्पमध्ये जानवळ येथील प्रसिद्ध पश्मी कारवान व इतर प्रजातीचे २०० श्वानांना मोफत अँटी रेबीज व्हॅक्सिनेशन व उपचार आणि औषधी वाटप करण्यात आले या प्रकल्पाचे प्रकल्प चेअरमन म्हणून रोटरी क्लब लातूर सेंट्रल चे डॉ. नेताजी शिंगटे व सह प्रकल्प चेअरमन म्हणून श्याम बरुरे यांनी काम पाहिले तसेच या कॅम्प ला आपल्या क्लब मधील रोटरी क्लब लातूर सेंट्रल चे अध्यक्ष हेमंत रामढवे , सचिव बाळासाहेब खैरे ,



आयपीडीजी डॉ ओमप्रकाश मोतीपवळे, विनोद बंडगे , जे डी मामडगे, गिरीश ब्याले , जितेंद्र कोरे ,तसेच प्राणी प्रेमी प्रशांत चौधरी यांचे योगदान लाभले व जानवळ परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यामध्ये शानप्रेमी श्वान मालक यांचा मोठ्याने समावेश होता.



# रोटरी व रोट्रॅक्ट क्लब ऑफ लातूर सेंट्रल वतीने दांडीया उत्सव संपन्न

रोट्रॅक्ट क्लब ऑफ लातूर सेंट्रल व रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल तथा गॅलेक्सी डान्स अकॅडमी लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दांडिया गरबा कार्यक्रम त्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा प्रेरणा होनराव मा अजित पाटील कवेकर मा श्रुती जैन रोटरी क्लब अध्यक्ष हेमंत रामढवे सचिव बाळासाहेब खैरे रोट्रॅक्ट अध्यक्ष वैभव बेल्लाळे सचिव सोमेश कानव गॅलेक्सी डान्स अकॅडमीचे संचालक अमोल स्वामी आरसीसी गिरीश ब्याळे प्रकल्प समन्वयक विजय धाकपाडे रोट्रॅक्ट चे प्रकल्प समन्वयक आदित्य शास्त्री , प्रतीक चव्हाण , ऋषभ लोखंडे , शैलेश गुंडरे व सूत्रसंचालन विनोद वीर बालाजी सुळ कार्यक्रमासाठी जजेस म्हणून माधुरी माकणीकर संतोष बेंबळकर सोनल ब्रिजवासी अजय मुंदडा आदींच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली या कार्यक्रमास रोटरी परिवार रोट्रॅक्ट परिवार व गॅलेक्सी डान्स अकॅडमी परिवार उपस्थितीत होता मान्यवरांच्या मनोगत झाले व आभार हेमंत रामढवे यांनी मांनले व आनंददायी वातावरणामध्ये कार्यक्रम संपन्न झाला

## Happy Birthday

**Birthday**

| | |
|---|---|
| Rtn. Ardale Chandrakant Dyanoba | 1 Sept. |
| Rtn.. Sen Rajesh Poonamchand | 1 Sept. |
| Rtn. Dhakpade Vijuaykumar Bharatrao | 3 sept |
| Rtn. Belure Sachin | 4 sept. |
| Rtn. Dr. Datal Rajkumar | 17 sept. |
| Rtn. Gundre Chandrakant Govindrao | 19 sept. |
| Rtn. Zapke Prasad | 25 sept. |

Club Trainer
**Rtn CA Jadhav Amol**
President Elect
**Rtn. Purushottam Nogja**
Vice President
**Rtn. Dr Sanjay Varad**
Joint Secretary
**Rtn. Pushapraj Khubba**
Treasurer
**Rtn. Chandrakant Gundare**
IPP
**Rtn. Rajgopalji Mundada**
Sargent at Arms
**Rtn. Girish Byale**

Directors
Club Administration
**Rtn. Girish Garthe**
Membership
**Rtn. Rajendra Surana**
Service Project
**Rtn. Ganesh Ige**
International Service
**Rtn.Adv. Jaganath Chittade**
TRF
**Rtn.Manath Popade**
District Emphasis
**Rtn. Shrikant Agroya**
women Empowerment
**Rtn.Anusaya Garad**
Public Image
**Rtn. yogesh Girwalkar**
Youth Service
**Rtn.Ravindra Chamle**
Vocational Service
**Rtn. Mehul Kamdar**
Environment
**Rtn.Ajay Tapdiya**
Human Development
**Rtn. Ramakant Joshi**
Literacy
**Rtn Jagannath Mamadge**
WINS
**Rtn.Vishnuji Sarda**
Community Development
**Rtn.Madhusudhan Parekh**
Fellowship Chairman
**Rtn.Sanjay Mundada**
Water Resources
**Rtn. Vinod Padge**
DEI-Diversity,Equity& Inclu-sion
**Rtn.Chandrkant Aradle**
Event Management Media
**Rtn.CA Radheshyam Biyani**

## Happy Birthday

| | |
|---|---|
| Bagde Rajesh | 28-10 |
| Barure Sham | 15-10 |
| Bhandari Laxmikant | 04-10- |
| Kathare S M | 07-10 |
| Maddewad Pankaj Nagendra | 01-10 |
| Mundada Sanjay Rameshji | 06-10 |
| Randad Vijay | 16-10 |
| Sarda Vishnuprasad Ramnivas | 07-10 |
| Soni Laxmikant | 17-10 |
| Sonwane Jayant | 06-10 |
| Zakir Golandaj | 02-10 |



### गांधी जयंती

मराठवाडा खादी ग्रामोद्योग लातूर येथे आज दि 02/10/22 रोज़ी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त रोटरी क्लब लातूर सेंट्रल चे अध्यक्ष व सचिव व तसेच रोट्रॅक्ट क्लब लातूर सेंट्रल चे अध्यक्ष व सचिव यांच्या हस्ते प्रतिमेची पूजा करून मराठवाडा खादी ग्राम उद्योग चे संचालक गिरीश जी ब्याळे यांच्या हस्ते सत्कारकरण्यात आला.

### निरोगी आरोग्यासाठी... (पान 3 वरून)

'मनकी बात' या मागील कार्यक्रमात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यानीही स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवाचे औचित्य साधून वरील विषयी सर्वांनी मिळून एक जनअंदोलन बनवण्याचे आणि "भरडधान्य जागरुकता" वाढवण्याचे अवाहन केले आहे.

एकूण जागतिक भरडधान्ये उत्पादनात भारताचा 20% एवढा सहभाग असुन तो वाढ करणेस,व शेतकर्यास तिचे निर्यातीस खूप मोठी जागतिक संधी आहे.

बाजरी व भगरीचे आहारात अनन्य साधारण महत्व असून हृदय रोगापासून सुरक्षा,रक्तातील कोलेस्टेरॉल कमी करणे,मधुमेह नियंत्रण,शरिरातील विषयुक्त कणाना नष्ट करणे,दमा-अस्थमा नियंत्रण,शांत झोप,त्वचा संरक्षण ई,फायदेशीर परिणाम संशोधनातून पुढे आलेले आहेत.,!

**लेखन: रो.जे. डी. मामडगे,**




RI Dist.3132
Rotary IMAGINE ROTARY
Club No. 56354
शुभ दिपावली
संवाद
रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल
OCT .2022

## संपादकीय

नमस्कार रोटरी मित्रांनो.
सर्वप्रथम आपणास दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.
आपल्यासमोर संवाद बुलेटीनचे चौथे तसेच ऑक्टोबर महिन्याचे प्रसारण सादर करत आहोत.
दरवर्षी 24 ऑक्टोबर हा रोटरी क्लबद्वारे जगभरात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो, ज्यामध्ये पोलिओचा कायमचा अंत करण्यासाठी एक दिवस एक फोकस या थीमसह अनेक निधी उभारणी आणि जागरुकता कार्यक्रम क्लबद्वारे आयोजित केले जातात.
या बुलेटीनमध्ये आपल्या समोर पोलिओ निर्मूलनात रोटरीची भूमिका या विषयावर डॉ.बिंदू शिरसाठ यांचे लेख सादर करत आहोत.
तसेच भरडधान्याचे आहारातील महत्त्व या विषयावर रो.जे डी मामडगे यांचे लेख सादर करत आहोत.
आपण लवकरच आपल्या रोटरी क्लब ऑफ लातूर, सेंट्रल ची वेबसाइट सुरू करण्याचा मानस केला आहे.
धन्यवाद
आपला

एडिटर
**रो. डॉ. लक्ष्मीकांत गौड**
रोटरी क्लबलातूरसेंट्र



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **रो. जेनेफर जोन्स** | **रो. रुकमेश जाखोटीया** | **रो. डॉ. पुरुशोत्तम दरक** | **रो. हेमंत रामढवे** | **रो. बाळासाहेब खैरे** | **रो.डॉ. लक्ष्मीकांत गौड** |
| अध्यक्ष | प्रांतपाल | उपप्रांतपाल | अध्यक्ष | सचिव | संपादक |
| रोटरी इंटरनॅशनल | रोटरी ३१३२ | रोटरी ३१३२ | रोटरी क्लब लातूर सेंट्रल | रोटरी क्लब लातूर सेंट्रल | रोटरी क्लब लातूर सेंट्रल |

# रोटरी आणि पोलियो निर्मूलन

फिलीपिन्स या देशात सप्टेंबर 1979 मध्ये पहिला पोलिओ लसीकरण प्रकल्प सुरू झाल्यापासून रोटरी 43 वर्षांपासून पोलिओ निर्मूलनासाठी 122 देशांतील सुमारे 4 अब्ज मुलांचे संरक्षण करण्यासाठी असंख्य स्वयंसेवक प्रयत्न करत आहेत। 1988 मध्ये ग्लोबल पोलिओ निर्मूलन उपक्रम (GPEI) चे रोटरी हे संस्थापक भागीदार आहे । यात 6 प्रमुख भागीदार रोटरी इंटरनॅशनल, WHO, UNICEF, यूएस सेंटर फॉर डिसीज अँड कंट्रोल प्रिव्हेंशन, बिल आणि मेलिडा गेट्स फाउंडेशन आणि GAVI यांच्या नेतृत्वा खाली GPEI ची स्थापना झाली व तेव्हा दरवर्षी पोलिओचे 350,000 रुग्ण होते आणि आता 99.9% ने कमी झाल्या आहेत.
अलीकडेच एप्रिल 2022 मध्ये, GPEI ने 2022 ते 2026 साठी पोलिओ निर्मूलन रणनीती सुरू केली आहे जी पोलिओ संपवण्याच्या उर्वरित आव्हानांवर मात करण्याचे आश्वासन देत आहे ज्यात अलीकडील पुनरुत्थानाची प्रकरणे आणि कोविड महामारी दरम्यान लसीकरण मोहिमेतील कमतरता यांचा समावेश आहे.
बिल आणि मेलिडा गेट्स फाउंडेशन त्यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे रोटरीद्वारे उभारलेल्या प्रत्येक डॉलरशी 2 डॉलर जुळतात.
रोटरीने 3 वर्षांसाठी दरवर्षी 50 दशलक्ष डॉलर जमा करण्याचे वचन दिले आहे जे बिल आणि मेलिडा गेट्स फाउंडेशनने match केल्यानंतर 450 दशलक्ष डॉलर्स होतील.
या वर्षी देखील जगभरातील रोटरी क्लबचे योगदान 40 दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त आहे. या निधीतून पोलिओ लस, समुदाय एकत्रीकरण आणि रोग शोधणे आणि संशोधन कार्याचा खर्च येतो.
श्रीमती राजश्री बिर्ला यांनी देखील यावर्षी रोटरीला 1 दशलक्ष डॉलर देण्याचे वचन दिले आहे आणि त्यांचे आजपर्यंतचे एकूण योगदान 16 दशलक्ष डॉलर इतके आहे जे 123 कोटी रुपये आहे आणि पोलिओमधील रोटरीच्या कार्यासाठी हातभार लावणारयात त्या sec-ond biggest donor आहेत.
दरवर्षी 24 ऑक्टोबर हा रोटरी क्लबद्वारे जगभरात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो, ज्यामध्ये पोलिओचा कायमचा अंत करण्यासाठी एक दिवस एक फोकस या थीमसह अनेक निधी उभारणी आणि जागरुकता कार्यक्रम क्लबद्वारे आयोजित केले जातात .
एनआयडी आणि एप्रिलमधील जागतिक लसीकरण सप्ताहातही रोटरी क्लबच्या सहभागावर भर दिला जातो.
RI अध्यक्ष जेनिफर जोन्स यांनी पोलिओ निर्मूलन कार्यक्रमासाठी US $150 दशलक्ष देण्याची घोषणा केली आहे .त्या म्हणाल्या की जंगली पोलिओ विषाणू केवळ अफगाणिस्तान आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये स्थानिक आहे आणि न्यूयॉर्कमधील सांडपाण्यात पोलिओ विषाणू आढळल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली . पोलिओ निर्मूलनासाठी आमचे प्रयत्न आणि निधी वाढवण्याच्या गरजेचा पुनरुच्चार त्यांनी केला.
निर्मूलन , एकात्मता , पोलिओमुक्त जगाचे प्रमाणीकरण आणि रोग प्रतिबंधक हे अंतिम खेळाचे धोरण आहे. रोटरीने फाईट टू द फिनिशचे वचन दिले आहे..

**RID 3132 पोलिओ निधी उभारणी धोरण**

1) पोलिओ प्लस सोसायटी 2021 मध्ये पहिल्यांदाच आपल्या डिस्ट्रिक्ट मध्ये स्थापित झाली । जिथे क्लब आणि वैयक्तिक रोटेरियन TRF पोलिओ फंडात किमान 100$ योगदान देतात आणि WHO पोलिओमुक्त जग प्रमाणित करेपर्यंत ते दरवर्षी देत राहतील. सध्या आपल्या जिल्ह्यात पोलिओ प्लस सोसायटीचे 30 सदस्य आहेत.
**उद्दिष्ट:** 2023 पर्यंत 3132मधील सर्व क्लब पोलियो सोसायटी मेंबर करणे.
2) प्रत्येक रोटेरियन वाढदिवस, वर्धापनदिन, एखाद्या प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ इत्यादी विशेष प्रसंगी पोलिओ निधीमध्ये काही रक्कम योगदान देऊ शकतो. पोलिओ निधीला देणे ही सवय लावण्यासाठी दरवर्षी असे केले जाऊ शकते.
3) पोलिओ निधीसाठी देणगी देण्यासाठी तुम्ही Donate to Polio on myrotary वर क्रेडिट कार्ड किवा नेट बँकिंग पर्याय वापरून ते अगदी सहजपणे करू शकता.
तरुणांना पोलिओ या घातक आजाराची जाणीव करून देण्यासाठी आणि लसीकरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी रोटरी क्लब इंटरॅक्ट आणि रोटरॅक्ट क्लबला व शाळा-महाविद्यालयांमध्ये तज्ज्ञांच्या मदतीने जनजागृती व्याख्याने, पोलिओवरील घोषवाक्य आणि पोस्टर



स्पर्धा, पर्यावरणपूरक रॅली, यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभागी करून घेऊ शकतात.
तुमच्या क्लबच्या बुलेटिनमध्ये पोलिओ निर्मूलनात रोटरीची भूमिका या विषयावर लिहिण्याची मला ही मौल्यवान संधी दिल्याबद्दल मी अध्यक्ष हेमंत रामधवे आणि रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल यांचे आभार मानते.

In rotary service ,
**Dr.Bindu Shirsath**
DCH Polio Plus Committee

रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल
संवाद Sept .2022
शुभ दिपावली

## अध्यक्षिय मनोगत

सर्वप्रथम रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल व रोटरी परिवारातील सर्वांना दीपावलीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा ऑक्टोबर महिना कम्युनिटी व इकॉनॉमिक डेव्हलपमेंट यासाठी समर्पित असून याच महिन्यामध्ये साजरी होणारी दीपावली साजरी करत असताना समाजातील आवश्यक घटकांपर्यंत मदत पोहोचवण्याची जबाबदारी दर्शवून देते त्याचा अनुषंगाने आगामी काळामध्ये ऍनिमल वेल्फेअर विषयात काही प्रकल्प होणार असून ग्रामीण भागातील बचत गटांना व महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा या अनुषंगाने देखील काही प्रकल्प होणार आहेत त्याचप्रमाणे मुलींच्या आरोग्यविषयक प्रकल्प देखील आगामी काही दिवसात होणार आहे या सर्व विषयांचे नियोजन ऑक्टोबर महिन्यामध्ये करण्यात आले असून रोटरी क्लब ऑफ लातूर सेंटरची संपूर्ण टीम यासाठी प्रयत्नशील आहे आपल्या सर्वांच्या सहयोगातून क्लबने चांगले प्रकल्प राबवून दीपावलीच्या सणानिमित्त ची बैठक वगळता सर्व बैठका वेळेवर घेऊन फ्रेंडशिप वृद्धिंगत व्हावी या अनुषंगाने कार्य केले आहे तसेच ते पुढे चालू राहील याच बरोबर विशेष उल्लेख करावयाचे क्लब मधील बुलेटीन एडिटर डॉक्टर लक्ष्मीकांत गौड यांच्या प्रयत्नातून प्रकाशित होत आहे त्यांच्या निरंतर मेहनत व प्रयत्नांना कौतुक करावे तेवढे कमी आहे त्यांच्या या मौल्यवान कार्यास शुभेच्छा देतो व आगामी काळात आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा बाळगतो धन्यवाद

अध्यक्ष
**रो हेमंत रामढवे**
रोटरी क्लब ऑफलातूरसेंट्र

# निरोगी आरोग्यासाठी शाकाहारीच पर्याय

जगभरात मानवी आहारांतर्गत सध्या गव्हू व तांदूळ–भाताचा वापर अधिक प्रमाणात होतो.यातून लठ्ठपणा,मधुमेह,हृदयरोग व रक्तवाहिन्यांचे आजार व निरोगीपणाची चिता वाढल्यामुळे प्राणीजन्य मांसाहारी आहाराऐवजी 'रस व वनस्पती' आधारित शाकाहारी आहाराकडे(व्हेगन फुड कडे)सर्वांचा कल वाढला आहे.अलिकडचे काळात लोक आरोग्याविषयी खूप जागरुक झाले असून सर्व शाकाहारी होत असून "व्हेगन फुड"कडे वळत आहेत.

वैश्विक स्तरावर मानवी आहारात प्राणीजन्य,दुग्धजन्य व वनस्पतीजन्य या तीन अन्न पदार्थांचा अधिकांश वापर होतो.लोक केवळ प्राण्यांच्या मांसाहारी खाद्यपदार्थापासुन 'प्रथिने' मिळवण्यावर अवलंबून असतात.. परंतू पालक,मसूर,नट्स,व बीन्स,मिलेट्स मध्येही निरोगी शरीर संवर्धनास पुरेशी 'प्रथिने' असतात.

सामान्य शाखाहारी आहारामधे भाज्या,फळे,तांदूळ व संपूर्ण धान्य/मिलेट्स आणि शेंगा यांचा समावेश असतो,या स्वस्त व कुठेही सहज..स्वस्तात उपलब्ध असतात..!

लोकाना कांही प्राणीजन्य पदार्थ खाण्याची सवय असते आणि ते स्वत:ला चवदार पाककृतीपासून वेगळे करु शकत नाहीत.परंतू वनस्पती आधारित खाद्यपदार्थ खाण्याची सवय लावणे व शाकाहारी अन्नातून समान चव मिळवणे खूप सोपे आहे..!

दुधजन्य पदार्थ शरिरास आवश्यक पोषणतत्वे पुरवतात.म्हणून दुधाला संपूर्ण अन्न म्हटले जाते.दुग्धजन्य पदार्थ कॅलशिअमयुक्त अन्न आहे,यामुळे हाडाना मजबूती मिळते,रक्तदाब नियंत्रण,मज्जातंतुना संदेश इ.कार्यात मदत होते.शाकाहारी आहारातुन कॅल्शिअम घेण्याचा विचार होतो तेंव्हा पालक,अंजीर,मटार,तीळ,बदाम यासारखे व स्वस्तातील "मिलेटवर्गीय भरडधान्यें" स्त्रोतही उपलब्ध आहेत..! आहारामध्ये भरडधान्यांचे वाढते महत्व जाणून घेणे खूप महत्वाचे आहे.

भरडधान्ये व त्याचे प्रकार:

नैसर्गिक शेतीसाठी उत्तम व अत्यंत कमी पाण्यात,हलक्या जमीनीत येणारे "मिलेट" हे निसर्गस्नेही पिके आहेत.ढोबळ मानाने यास भरडधान्ये म्हणून ओळखले जाते.पृथ्वीच्या/वसुंधरेच्या व मानवाच्या आरोग्याची उत्तम काळजी घेणारी ही जादुई धान्ये समजून घेणे खूप रोचक आहे.

गव्हु व तांदूळ सोडून इतर जे धान्य नियमित आपले आहारात वापरले जाते त्याला आपण भरडधान्य असे म्हणू शकतो.ज्वारी, बाजरी,नाचणी ही भरडधान्ये आपण पीठ करुन खावू शकतो तर वरई,राळी,भगर,बार्टी,कोदो,डेंगळी ही इतर भरडधान्ये त्यावरील साल बाजुला केल्यावर खाण्यायोग्य होतात..!

एकूण आकरा प्रकारचे भरडधान्ये "मिलेट"गटात समाविष्ट आहेत.त्यातील नऊ भारतीय मिलेटची नावे व प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

ज्वारी(Sorghum):हे पीक सर्वदूर कोरडवाहू भागात मोठ्या प्रमाणात सोलापूर,विदर्भ,मराठवाडा व खानदेशात घेतले जाते.यात सफेद,पिवळी,लाल अशा विविध रंगछटा असणारी ज्वारी पहावयास मिळते.

बाजरी (Pearl millet):हलके–कोरडवाहू जमीनीत,अत्यंत कमी पावसावर अल्पावधीचे(70–75दिवसाचे) हे भरडधान पीक पूर्वीपासुन घेतले जाते.काळ्या मातीवरील पिकाची चव अजून वेगळीच असते.यात तपकिरी,हिरवा व लाल अशा रंगछटा दिसतात.

नाचणी(Finger millet):नाचणीला 'सुपरफुड'ही मान्यता आधीपासूनच आहे.सर्व भागात होणारी ही नाचणी आता केवळ डोंगरभाग व कोंकणात घेतली जाते.यात सफेद,लाल–केशरी व मरुन–लाल या रंगात येते.

वरई(Little millet): आजही आदिवासी व कोकण भागात हे पीक मोठ्या प्रमाणात होते.डोंगर शेतीतील हे मुख्य पीक आहे.कमी व जास्त दिवसांच्या अशा विविध जाती आहेत.

वरी(Proso millet): वरईसारखेच दिसणारे हे धान्य परंतु त्याचे गुणधर्म व पोषकमुल्य हे भिन्न आहेत.

राळा/भादली(Foxtail millet): पूर्वी सर्व भागात राळा पिकवला जाई.याचा भात अत्यंत चविष्ट लागतो.पितराना राळ्याचीच खीर असते.यातसुध्दा विविध रंग अढळतात.

कोडो/कोद्रा(Kodo millet): एकावर एक सात थर असणारे हे धान्य,याचे वैशिष्ट्य म्हणजे..याचे आवरण काढले नाही तर हे अनेक वर्षे ठेवता येते..! हे पीक गडचिरोली,धुळे व कोंकणात घेतले जाते.

बर्टी(Barnyard millet): सर्वात कमी दिवसात पक्व होणारे हे धान्य अनेक रंगात उपलब्ध.कोरडवाहू व अतिपाऊस असणारे दोन्ही भागात हे पीक उत्तम येते. खाण्यास चविष्ट व पौष्टिक असे हे धान्य आहे.

ब्राउनटॉप मिलेट(Browntop millet): दक्षिण भारतात घेतले जाणारे हे पोषक धान्य असून हे खाल्यानंतर अनेक तास भूक लागत नाही.भरपूर ऊर्जा यातून मिळते!

मिलेटचे महत्व :

ही सर्व धान्ये कमी व जास्त दोन्ही पावसाचे भागात येतात.मिलेट हे वापरात असलेले गव्हु व तांदूळ या नियमित धान्यासाठी एक चविष्ट व पौष्टिक पर्याय आहे.भात व गव्हु ही धान्यपिके आपल्याला अन्नसुरक्षा देतात.तर मिलेट हे धान्य अन्नसुरक्षे (Foodsecu–rity)सह पोषणसुरक्षा(Nutrition securi–ty),आरोग्यसुरक्षा(Health security),शेतकरी उपजिविका सुरक्षा(Livelyhood secu–rity),जनावरांच्या चार्याची सुरक्षा(Fodder security)व पर्यावरण संवर्धन सुरक्षा(Ecological security) पुरवते.




अन्न सुरक्षा: केवळ भात व गव्हु या दोनच धान्य पिकावर अन्नासाठी अवलंबून रहाणेपेक्षा,बदलत्या हवामानात तग धरु शकणारे मिलेट हे नक्कीच भारताची भूक भागवू शकेल.

पोषण सुरक्षा: जागतिक 'फुड रेटिंग सिस्टिम' मध्ये मिलेटला 'उत्तम' असे रेटिंग देण्यात आलेले आहे.शरिराला आवश्यक असणारे पोषक तत्वे व सूक्ष्म पोषण तत्वे यांचे प्रमाण भरडधान्यात योग्य आहे.उदा. कॉपर,फॉस्फरस,मॅग्नीज,मॅग्नेशियम हे सुक्ष्मघटकही महत्वाचे आहेत.कर्बोदके आणि उर्जा याचे प्रमाणही जादाचे आहे.आज रक्तक्षय असणारे संख्या फार मोठी आहे,त्यासाठी नाचणी मिलेट धान्य सर्वोत्तम आहार आहे.

जनावरासाठी चारा सुरक्षा: या धान्यांच्या काडाचा/कडब्याचा जनावरांचे चार्यासाठी होतो,ज्यात मोठ्या प्रमाणात सेल्युलोज असतात.हा चारा जनावरे आवडीने खातात.

शेती–उपजिवीकेची सुरक्षा: जिथे पाण्याची सोय नाही अशा कोरडवाहू,हलक्या जमिनीत मिलेटचे चांले उत्पन्न मिळते.पाणी खूप कमी लागते.जिथे 1 किलो भात पिकवणेस 5000लि.पाणी लागते.. तिथे फक्त 200लि.पाण्यात 1 किलो मिलेट पीक घेता येते.रासा.खते लागत नाहीत.हे पीक कोणत्याही हवामानात घेता येते.मिश्रपिक पध्दतीचा अवलंब करता येतो.

पर्यावरण व भू–सुरक्षा: मिलेट घेतले जाते अशा जमिनीत नत्राचे प्रमाण वाढून जमीनीचा कस सुधारतो,इतर पीक विविधता जपली जाते.मिलेटचे शेतात अनेक रानभाज्या व इतर वनस्पतींची वाढ होते.यामुळे पर्यावरण रक्षण होते.जमीन वाळवंटीकरण रक्षण होते,जमीनीतील सूक्ष्मजिवाणू व गांडुळांचे रक्षण होउन भूमाता सुपीक बनते.

ग्राहक भूमिका महत्वाची: बदललेले जीवनशैलीतून खानपाण सवयी बदलत आहेत.वेळेअभावी बाहेरचे जंक खाद्यपदार्थ खाण्याकडे कल वाढतो आहे..रेडीमेड व बाजारु पदार्थाकडे आकर्षण वाढत जात आहे.जेकि आरोग्यपूरक नाही.तथापि सर्वात झटपट उपलब्ध असणारे मिलेट व त्यापासून बनवलेले अनेक पौष्टिक पदार्थ आपणास आरोग्यदायी व चविष्ट पर्याय उपलब्ध आहेत. जेव्हा मिलेट पदार्थ आपले थाळीत व जेवणात आले तरच ते शेतात उगवले जाईल.ही ग्राहक मानसिकता सुधारणा महत्वाची वाटते.

2023 हे 'आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष':

आंतरराष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषणामध्ये भरडधान्यांचा असणारा सहभाग याकडे लक्ष वेधणे,भरडधान्य उत्पादनांची शाश्वत वाढ करणे व विविध जागतिक व प्रादेशिक स्तरावर भरडधान्यांची मागणी वाढविणेसाठी प्रचार–प्रसार करणे या उद्देशाने 2023 हे वर्ष "आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष" म्हणून साजरे केले जात आहे.

संवाद

**रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल**

Club Trainer
**Rtn CA Jadhav Amol**
President Elect
**Rtn. Purushottam Nogja**
Vice President
**Rtn. Dr Sanjay Varad**
Joint Secretary
**Rtn. Pushapraj Khubba**
Treasurer
**Rtn. Chandrakant Gundare**
IPP
**Rtn. Rajgopalji Mundada**
Sargent at Arms
**Rtn. Girish Byale**

Directors
Club Administration
**Rtn. Girish Garthe**
Membership
**Rtn. Rajendra Surana**
Service Project
**Rtn. Ganesh Ige**
International Service
**Rtn.Adv. Jaganath Chittade**
TRF
**Rtn.Manath Popade**
District Emphasis
**Rtn. Shrikant Agroya**
women Empowerment
**Rtn.Anusaya Garad**
Public Image
**Rtn. yogesh Girwalkar**
Youth Service
**Rtn.Ravindra Chamle**
Vocational Service
**Rtn. Mehul Kamdar**
Environment
**Rtn.Ajay Tapdiya**
Human Development
**Rtn. Ramakant Joshi**
Literacy
**Rtn Jagannath Mamadge**
WINS
**Rtn.Vishnuji Sarda**
Community Development
**Rtn.Madhusudhan Parekh**
Fellowship Chairman
**Rtn.Sanjay Mundada**
Water Resources
**Rtn. Vinod Padge**
DEI-Diversity,Equity& Inclusion
**Rtn.Chandrkant Aradle**
Event Management Media
**Rtn.CA Radheshyam Biyani**

## Happy Anniversary

| | |
|---|---|
| Agroya Shrikant | 18-November |
| Girwalkar Yogesh | 28-November |
| Godbharle Vittal Uttamrao | 25-November |
| Nagoja Purushottam | 25-November |
| Son Rajesh Poonamchand | 21-November |
| Shetkar Sukhanand | 28-November |
| Siddheshware Sanjay | 23-November |

## Happy Birthday

| | |
|---|---|
| Rtn. Aurade Mahesh | 07-November |
| Rtn. Godbharle Vittal Uttamrao | 26-November |
| Rtn. Khubba Shivkumar Kashinath | 08-November |
| Rtn. Nagoja Purushottam | 11-November |
| Rtn. Pandage Vinod Namdevrao | 09-November |
| Rtn. Swami Suryakant Baburao | 10-November |

## PRE-PETS ZONE B PRESIDENT-SECRETARY 2023-24

**HOSTED BY ROTARY CLUB OF LATUR CENTRAL**







रोटरी डिस्ट्रिक्ट 3132 वर्ष 2023 24 करिता ( प्री पेट्स) पुढील वर्षाच्या अध्यक्ष व सचिव झोन बी यांचा प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक 20 नोव्हेंबर 2022 ला होस्ट करण्याची संधी आपल्या रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल ला DGE स्वाती हेअरकल यांनी प्रदान केली त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार या कार्यक्रमांमध्ये झोन बी च्या अध्यक्ष व सचिव यांना एक दिवसाचे मार्गदर्शन कार्यक्रम ज्यामध्ये प्रमुख वक्ते म्हणून 2023 24 चे डिस्टिक ट्रेनर पीडीजी डॉ दीपक पोफळे पीडीजी डॉ बाळ इनामदार डीजीइ स्वाती हेरकल आयपीडीजी डॉ ओमप्रकाश मोतीपवळे आदींचे मार्गदर्शन लाभले त्याचबरोबर या कार्यक्रमांमध्ये झोन बी चे सर्व असिस्टंट गव्हर्नर्स उपस्थित होते या कार्यक्रमाचे फोरम लीडर म्हणून रो संजय बोरा कन्व्हेनर म्हणून रो विनय जाजू को कन्व्हेनर म्हणून रो गिरीश गारठे अध्यक्ष रो हेमंत रामढवे सचिव रो बाळासाहेब खैरे व इतर सदस्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे धन्यवाद

## संपादकीय ..!

नमस्कार रोटरी मित्रांनो.
आपल्यासमोर संवाद बुलेटीनचे पाचवे तसेच नोव्हेंबर महिन्याचे प्रसारण सादर करत आहोत.
या महिन्यात रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलने PRE–PETS चा कार्यक्रम HOST ब म्हणून आयोजित केला त्या कार्यक्रमांमध्ये सर्व क्लबचे प्रेसिडेंट सेक्रेटरी हे उपस्थित होते तसेच रोटरी मेंबर्सनी मोठ्या संख्येनेआपला सहभाग नोंदवला.
रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल आणि खंडोबा देवस्थान लातूर यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आणि या शिबिरामध्ये उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.
तसेच या बुलेटीन मध्ये आपल्यासमोर सत्संगती या विषयावर संस्कृत भाषेमध्ये लेख सादर करत आहोत.
आपण लवकरच आपल्या रोटरी क्लब ऑफ लातूर, सेंट्रल ची वेबसाइट सुरू करण्याचा मानस केला आहे.
धन्यवाद
आपला
एडिटर

रो. डॉ. लक्ष्मीकांत गौड
रोटरी क्लब लातूर सेंट्रल

RI Dist.3132 Club No. 53354

Rotary IMAGINE ROTARY


# संवाद

**रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल**



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रो. जेनेफर जोन्स | रो. रुकमेश जाखोटीया | रो. डॉ. पुरुशोत्तम दरक | रो. हेमंत रामढवे | रो. बाळासाहेब खैरे | रो.डॉ. लक्ष्मीकांत गौड |
| अध्यक्ष | प्रांतपाल | सहप्रांतपाल | अध्यक्ष | सचिव | संपादक |
| रोटरी इंटरनॅशनल | रोटरी ३१३२ | रोटरी ३१३२ | रोटरी क्लब लातूर सेंट्रल | रोटरी क्लब लातूर सेंट्रल | रोटरी क्लब लातूर सेंट्रल |

## Jennifer Jones President 2022-23 November 2022 Presidential message



Being asked to Imagine Rotary can seem like a big, heady exercise, but the most important element of it is something quite small, even personal.

Not too long ago, Rotary members were expected to perform our acts of service quietly. I understood and appreciated the thought behind that —humility is a wonderful trait, and we should continue to nurture it in other ways.

But keeping Rotary to ourselves has a cost. and by sharing our Rotary moments, we are being generous with others and giving them an opportunity to understand the impact of Rotary.

It brings to mind that wonderful aphorism: "People will forget what you said. People will forget what you did. But people will never forget how you made them feel."

So how do we make people feel Rotary? The best way is to share our Rotary moments. We have all had them — when the ordinary collides with intention to create something extraordinary.

Some people have those Rotary moments the first time they go to a meeting. For others, it can take years, before seeing the joy in the eyes of someone we serve. Or perhaps in hearing from another member something that hit close to home.

As Nick and I share this journey, we are amazed at the work you are performing and the lives that are transforming. Throughout the year, I'm going to share with you the sights and the stories that made those tours meaningful for us.

I hope you can do the same in your corner of Rotary. It can be something you share in meetings or on social media. For the most savvy and ambitious, it could be an event you publicize with local media. Even sharing your stories with friends has impact.

We need ambassadors for Rotary's message and our dreams for a better world. The best ambassadors are you. The more you share stories — and share them from the heart — the more you encourage others to partner with us, to join us, and to stay.

To give you just one small example, in the months ahead, I will be turning over this column to Rotary members who will share their personal stories as they relate to diversity, equity, and inclusion in our organization. It's important that we hear these stories directly from the people who experienced them as a way of feeling the importance of DEI for the future of Rotary. In everything we do, what people feel about Rotary will shape our future. I can only imagine what you will inspire through the stories you'll tell.












## रक्तदान जीवनदान

रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल व श्री जय मल्हार खंडोबा देवस्थान संस्था लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर दिनांक २९ नोवेंबर २०२२ रोजी आयोजित करण्यात आला. या रक्तदान शिबिरामध्ये उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला प्रोजेक्ट चेअरमन, चंद्रकांत गुंडरे

# अध्यक्षाचे मनोगत

रोटरी मित्रांना नोव्हेंबर बुलेटीन अंकाच्या शुभेच्छा नोव्हेंबर महिना हा फाउंडेशन मंथ म्हणून साजरा केला जातो ज्यामध्ये पोलिओ टीआरएफ रोटरी फाउंडेशन यांना देणगी देण्यासाठी प्राधान्य दिले जाते आपल्या क्लबचे माजी अध्यक्ष तथा यावर्षीचे असिस्टंट गव्हर्नर एडवोकेट नंदकिशोर लुया यांनी फाउंडेशन साठी शंभर डॉलर चा निधी देऊन एक पुण्य कर्म केले त्याबद्दल त्यांचे क्लबच्या वतीने खूप खूप अभिनंदन व आभार याच पद्धतीने आपल्या क्लबच्या सदस्यांचे वाढदिवस तथा विवाह वाढदिवस या दिवशी आपण फुल नाही फुलाची पाकळी या स्वरूपामध्ये देणगी द्यावी असे आवाहन आपले रोटरी फाउंडेशन चे डायरेक्टर मनमतआप्पा पोपडे हे नेहमी करत असतात त्यांच्या हाकेला प्रतिसाद देत काही सदस्यांनी देणगी देखील दिली आहे त्यांचे देखील आभार रोटरीने निर्धारित केलेल्या प्रत्येक महिना आपण त्या त्या विषयानुसार साजरा करावा अशी मी सर्वांना विनंती करतो धन्यवाद



# ANNIVERSARY MEET









रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या सदस्यांचे विवाह वाढदिवस एकाच महिन्यामध्ये बऱ्याच जणांचे आले त्याच्या औचित्य साधून त्या सदस्यांच्या सहयोगातून एनिवर्सरी नीट चे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये साधारणता 45 सदस्यांनी सपत्नीक सहभाग नोंदवला या कार्यक्रमांमध्ये विवाह क्षण स्मरण करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला ज्यामध्ये एकमेकांना हार घालून अक्षदा टाकण्यात आल्या तसेच नाव घेणे तसेच कपल साठी काहीगेमचे आयोजन करण्यात आले होते ज्याचा आनंद सर्व सदस्यांनी घेतला याच कार्यक्रमानंतर सर्व सदस्यांसाठी भोजनाचे आयोजन करण्यात आले होते विष्णूजी की रसोई या ठिकाणी त्यातील पारंपारिक भोजनाचा आस्वाद सर्व सदस्यांनी घेतला खेळीमेळीच्या वातावरणामध्ये कपल मिट संपन्न झाली या प्रकल्पासाठी रोटेरियन अजय तापडिया भालचंद्र तळकरी गिरीश ब्याळे यांनी सहपरिवार परिश्रम घेतले.